॥ माझें गाणें ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः त्र्यं. ठोमरे
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

माझें गाणें, एकच माझें नित्याचें गाणें;
अक्षय गाणें, अभंग गाणें, गाणें हे गाणें ॥ धृ. ॥

सर्व जगाचे मंगल, मंगल हे माझें गाणें;
या विश्वाची एकतानता हें माझें गाणें॥
आशेच्या वीणेवर चढवुनि सूर भौतिकांत
हें गाणें, हे प्रियकर माझें गाणें मी गात ॥ १ ॥

निरध्वनी हें, मूक गान हें यास म्हणो कोणी,
नभांत हें सांठवलें यानें दुमदुमली अवनी॥
सर्व धर्म हे, भेद-पंथही सर्व एक झाले;
माझें माझें विश्व, तार ही प्रेमाची बोले ॥ २ ॥

ही मोक्षाची स्वातंत्र्याची, उन्नतिची माला
सौभाग्याची तार लागलों मी छेडायाला॥
हे नंदवदन ही स्वर्भूमी एक पहा झालीं!
मंगल मंगल मद्गानाची गति ही शेवटली ॥ ३ ॥